माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल झालेला तक्रार अर्ज**

तक्रार क्र.रामाआ /तक्रार-१७७/२०१९/सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| तक्रारदार | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| संदिप तात्यासाहेब पवार | गाव कामगार तलाठी, तलाठी खातगुण, ता.खटाव, जि.सातारा | तहसिलदार, तहसिल कार्यालय खटाव, ता.खटाव (वडुज), जि.सातारा |

<u>तक्रार सुनावणी दिनांक -दि.०१/१२/२०२३</u>

तक्रारदार यांनी दि. १/०८/२०१९ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

" तक्रारदार यांनी दि.२३/०५/२०१९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सज्जा खातगुण ता.खटाव यांचेकडे माहिती अर्ज दिला होता. सदर अर्जाची माहिती जन माहिती अधिकारी तथा तलाठी खातगुण यांनी माहिती दिली नाही, अशी तक्रार त्यांनी केली होती."

त्यानुसार आज दि.०१/१२/२०२३ रोजी आयोजित सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी खातगुण श्री. प्रमोद नरहर इनामदार हजर होते.

श्री.प्रमोद नरहर इनामदार, तलाठी खातगुण यांनी सूचित केले की, आयोगाचे आदेशाचे वेळी ते जन माहिती अधिकारी नव्हते. त्यावेळी श्री. जयप्रकाश रघुनाथ चव्हाण हे तलाठी होते. ते आता सेवानिवृत्त झाले आहेत.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.इनामदार यांनी सूचित केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाला दि.१४/०८/२०१९ रोजी उत्तर दिले असून त्याची नोंदणीकृत टपालाची पोच सुनावणीचे वेळी आयोगास सादर केली.

तक्रारदार यांनी प्रथम अपील केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपील सुनावणी घेऊन दि. ०८/०८/२०१९ रोजी माहिती पुरविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार तत्कालीन जन

माहिती अधिकारी तथा तलाठी श्री. जयप्रकाश रघुनाथ चव्हाण यांनी दि.१४/०८/२०१९ रोजी नोंदणीकृत टपालाने माहिती पुरविली असून तशी पोच आयोगास सादर केली आहे.

आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कारवाई केली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश पारित केला आहे.

संबंधित अधिकारी यांनी कारवाई केली असून तक्रारदार यांचे तक्रारीमध्ये काही तथ्य आढळून येत नाही.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश.**

तक्रारदाराचा तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.तक्रार क्रमांक १७७/२०१९/सातारा / SD68/2023 दिनांक 12/12/2023